अंगणवाडी केंद्र इमारतीचे बांधकामासाठी राज्यस्तरावर अर्थसंकल्पित केलेला निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्र.एबावि-२०१८/प्र.क्र.११०/का.६
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- ३० मार्च, २०१८

संदर्भ :- (१) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.एबावि-२००८/प्र.क्र.१७३/का.६, दिनांक १५ जानेवारी, २०१०
(२) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.एबावि-२०१३/प्र.क्र.१५८/का.६, दिनांक २९ जानेवारी, २०१४

शासन निर्णय :-

महिला व बाल विकास विभागामार्फत राज्यात अंगणवाडया चालविण्यात येतात. अंगणवाडयांच्या इमारती बांधण्यासाठी दिनांक १५ जानेवारी, २०१० च्या शासन निर्णयानुसार आराखडा निश्चित करण्यात आला असून बिगर आदिवासी क्षेत्रासाठी एका अंगणवाडी बांधकामासाठी रुपये ६.०० लाख व आदिवासी क्षेत्रासाठी रुपये ६.६० लाख इतका निधी मंजूर करण्यात येतो.

२. शासनाच्या विविध योजनांतर्गत अंगणवाडी बांधकामासाठी निधी उपलब्ध होत असून त्यामध्ये प्रामुख्याने जिल्हा वार्षिक योजना, १३ वा वित्त आयोग, नाबार्ड, अल्पसंख्याक विभाग, मानव विकास मिशन, आदिवासी उपयोजना तसेच मनेरेगा अंतर्गत निधी प्राप्त होत असतो. अंगणवाडी इमारत बांधकाम करण्यासाठी ग्रामपंचायतीकडून मोफत जागा उपलब्ध होणे आवश्यक आहे. अंगणवाडी बांधकामासाठी निधी मंजूर केल्यानंतर सदर आर्थिक वर्षात जागा उपलब्ध न झाल्यास, तसेच पाण्याचा दुष्काळ असल्यास, विहित कालावधीत इमारतीचे बांधकाम पुर्ण करुन घेणे जिल्हा परिषदेस शक्य होत नाही. परिणामत: मोठयाप्रमाणावर निधी अखर्चित राहिलेला आहे.

३. अंगणवाडी बांधकामासाठी यापुर्वी राज्यस्तरावर लेखाशिर्ष उपलब्ध नसल्यामुळे निधी अर्थसंकल्पित करण्यास अडचणी येत होत्या. सन २०१७-१८ पासून अंगणवाडी बांधकामासाठी नविन लेखाशिर्ष राज्यस्तरावर ४२३६००६७ मंजूर करुन घेण्यात आलेले आहे. सदर लेखाशिर्षाखाली निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे. अंगणवाडी बांधकामासाठी राज्यस्तरावरुन १००% (४२३६००६७) या लेखाशिर्षाखाली रुपये १०.०० कोटी निधी अर्थसंकल्पित केलेला आहे. **ज्या जिल्हयात अंगणवाडी केंद्राच्या इमारतींची बांधकामे १००% पुर्णपणे बांधून तयार झालेली आहेत, केवळ कंत्राटदारांना निधी देणे बाकी आहे अशी बांधकामे (बांधकामासाठी मंजूर करण्यात आलेल्या आर्थिक निकषानुसार पूर्णपणे निधी मंजूर केलेला नाही अशीच बांधकामे) अशा जिल्हयांना सदर निधी उपलब्ध करुन देण्यास शासन मंजूरी देत आहे.**

४. आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांनी **ज्या जिल्हयात अंगणवाडी केंद्राच्या इमारतींची बांधकामे १००% पूर्णपणे बांधून तयार झालेली आहेत व केवळ कंत्राटदारास निधी देणे बाकी आहे अशा जिल्हयांना सदर निधी वितरीत करावा.**

खालील लेखाशिर्षातंर्गत निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(रुपये लाखात)

लेखाशिर्ष	बाब	या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात येत असलेला निधी
४२३६००६७ (राज्य)	५३-मोठी बांधकामे	१०००.००
एकूण		१०००.००

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३३११०१७१९४२३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Lalsing Ramchandra Gujar

Digitally signed by Lalsing Ramchandra Gujar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3eb5f6c3e4855c5793924cf2a352b44266d360de02a2494e1a64477bf79d694, cn=Lalsing Ramchandra Gujar
Date: 2018.03.31 23:06:08 +05'30'

(ला. रा. गुजर)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर.
२) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
३) निवासी लेखापरिक्षा अधिकारी,मुंबई
४) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
५) आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे.
६) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, रायगड भवन, नवी मुंबई.
७) सर्व जिल्हाधिकारी
८) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद)
९) सर्व कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, बांधकाम विभाग
१०) सर्व महिला व बाल विकास अधिकारी (जिल्हा परिषद)
११) सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण/नागरी/आदिवासी) प्रकल्प
१२) वित्त विभाग (व्यय/६ ,अर्थसंकल्प-७), मंत्रालय, मुंबई.
१३) (नियोजन विभाग/का.१४७२),मंत्रालय,मुंबई.
१४) कक्ष अधिकारी (का-४), महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी BDS प्रणालीवर निधी आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांना वितरीत करावा.

१५) निवड नस्ती -का-६.